निशाणी क्रमांक ४८/(ब) दीर्घ वाद **'एल्'**
(दिवाणी नियमावली प्रकरण ९ परिच्छेद २२३)

**वाद मुद्दे**

(दिवाणी प्रक्रिया संहिता, **१९०८** चा क्रम **१४** नियम **२ व ३**)

**०१.** वादी, वाद मिळकत म्हणजेच मौजे वेलशेत, गट क्रमांक ९३ हिस्सा क्रमांक १, क्षेत्र हेक्टर १.६०.० आर, आकार रूपये १.६४ पैसे सखु रामजी लवटे हिच्या मालकीची होती व आहे असे सिद्ध करतात काय?

**०२.** वादी, मयत पांडुरंग नारायण लवटे व मयत कृष्णा नारायण लवटे यांचा वाद मिळकतीत वारसा हक्काने प्रत्येकी १/२ अविभक्त हिस्सा आहे असे सिद्ध करतात काय?

**०३.** वादी, प्रतिवादींनी वाद मिळकतीत बांधकाम करण्यास चालू केले आहे असे सिद्ध करतात काय?

**०४.** वादी, प्रतिवादींकडून वाद मिळकतीचे वाटप होवून त्यांचा अविभक्त हिस्सा निरतुटक होवून मिळण्यास पात्र आहेत असे सिद्ध करतात काय?

**०५.** वादी, प्रतिवादींनी वाद मिळकतीत कोणतेही बांधकाम करू नये, अविभक्त हिश्यास बाध होईल असे कोणतेही कृत्य करू नये किंवा ति-हाईताचा हक्क निर्माण करू नये असा निरंतर मनाई आदेश मिळण्यास पात्र आहेत असे सिद्ध करतात काय?

**०६.** **वादींच्या दाव्यास आवश्यक पक्षकारांच्या अपसंयोजन** (mis-joinder) **व असंयोजनाची** (non-joinder) **बाधा आहे असे प्रतिवादी क्रमांक ०१ सिद्ध करतो काय?**

**०७.** वादींच्या दाव्यास विलंब (delay), मौन संमती (latches) व प्रतिष्ठंभ / प्रतिबंध कबुली (estoppel) या तत्वांची बाधा आहे असे प्रतिवादी क्रमांक ०१ सिद्ध करतो काय?

**०८.** कृष्णा लवटेच्या हयातीत तोंडी वाटप होवून वाद मिळकत त्याच्या हिश्यास दिली होती व तो मिळकतीचा उपभोग घेत होता असे प्रतिवादी क्रमांक ०१ सिद्ध करतो काय?

**०९.** पांडुरंग लवटेच्या हिश्यात तोंडी वाटप व्यवस्थेनुसार मुळ सर्व्हे क्रमांक ६० नवीन २८ व मुळ सर्व्हे क्रमांक ६१ नवीन २९ दिले होते असे प्रतिवादी क्रमांक ०१ सिद्ध करतो काय?

**१०.** वादी त्यांनी मागणी केलेले अनुतोष मिळण्यास पात्र आहेत काय?

**११.** अंतीम आदेश, हुकुमनामा व खर्चाबाबत आदेश काय?

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**ठिकाण : रोहा.** **दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**दिनांक : १७.०९.२०१६** **जिल्हा रायगड.**

टीप : १. पटल लिपीकाने उभय पक्षांच्या विधीज्ञांकडून वाद मुद्यांची नोंद सही व तारखेसह करून घ्यावी.

२. वादी व प्रतिवादीने पुढील तारखेला दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम १६ नियम ०१ नुसार ते तपासणार असतील अशा प्रस्तावीत साक्षीदारांची यादी दाखल करावी.

३. वादी व प्रतिवादीने पुढील तारखेला साक्षीदारांची यादी सादर न केल्यास त्यांना स्वत: व्यतीरीक्त अन्य साक्षीदार तपासायचे नाहीत असे गृहीत धरले जाईल व पुढील आदेश पारीत केला जाईल.